

कुलगुरु कै. वि. गं. तथा
दादासाहेब केतकर

।। विद्वान् सर्वत्र पूज्यते ।।





शिक्षणमहर्षी कै. डॉ. ग. श्री.
तथा अण्णासाहेब खैर

पुणे विद्यार्थी गृहाचे मासिक

समाचार

Pune Vidyarthi Griha's 'Samachar' Magazine January 2020 - Pages - 36

संपादक : श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे

कार्यकारी संपादक : प्राचार्य हणमंत भोसले

❊ पुणे ❊ वर्ष ७१ वे ❊ अंक ३ ❊ किंमत रु. १०/- ❊ वार्षिक वर्गणी रु. १००/-



मुक्तांगण इंग्लिश स्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ९ प्राथमिक विभागाचे स्नेहसंमेलन प्रसंगी प्रमुख पाहुण्या माजी विद्यार्थींनी, नृत्यांगना आणि अभिनेत्री कु. ऐश्वर्या काळे यांचा सत्कार करताना कार्याध्यक्ष श्री. सुभाष जिर्गे, समवेत डावीकडून संचालक श्री. रमेश कुलकर्णी, कुलसचिव श्री. सुनिल रेडेकर, प्र. मुख्याध्यापिका सौ. उत्कर्षा केणी, प्र. प्राचार्या सौ. हेमांगिनी इनामदार, सौ. नूतन नेऊरगांवकर, शिक्षिका आणि विद्यार्थी प्रतिनिधी कु. तीर्था जोतावार

✲ अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, पुणे ✲



'**Tom Frescka National Level Competition**' मध्ये सहभाग घेऊन 'प्रिंटवीक स्टुडंट ऑफ द इयर' हे पारितोषिक मिळविलेल्या कु. रुची अभंग (माजी विद्यार्थिनी मुद्रण अभियांत्रिकी) हिचे अभिनंदन करताना
कुलसचिव श्री. सुनिल रेडेकर आणि संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर, समवेत डावीकडून प्रा. डॉ. शिवाजी गवळी, प्राचार्य डॉ. योगेश नेरकर, उपप्राचार्या डॉ. कल्याणी कुलकर्णी, प्रा. सौ. मधुरा महाजन, प्रा. मराठे, डॉ. वृंदा जोशी

* gñWm '»¶mb¶, nU *



देणगीदार श्री. चिंतामण त्र्यंबक मराठे आणि सौ. रोहिणी चिंतामण मराठे यांनी माजी विद्यार्थी ऋणविमोचनार्थ रुपये एक लाखाची सदिच्छा देणगी श्री. चंद्रशेखर चिंतामण मराठे यांचे हस्ते दिलेली आहे.
सदर चेक स्वीकारताना सेवक श्री. दत्तात्रय शिंदे, समवेत सौ. स्मीता चंद्रशेखर मराठे

संपादकीय

अनामिक भीती

जीवनामध्ये आपणास प्रत्येक टप्प्यावर वेळो वेळी येणाऱ्या प्रसंगाविषयी एक प्रकारच्या अनामिक भीतीस सामोरे जावेच लागते. तो प्रसंग किंवा परीक्षा पूर्ण होईपर्यंत ती भीती नाहीशी होत नाही. नवीन वर्ष सुरु झाले की चाहूल लागते ती जवळ आलेल्या परीक्षांची. सर्व महत्त्वाच्या म्हणजे इ. १० वी व इ. १२ वी परीक्षा. या कालावधीत परीक्षेच्या वेळेत जागरूक पालक आपल्या पाल्याची सर्वतोपरी काळजी घेऊन, त्यांच्या अभ्यासात कोणताही अडथळा येऊ नये याची काळजी घेतात. परिक्षेच्या संदर्भात त्यांनी अनुभवलेल्या प्रसंगातून मार्गदर्शनही करतात. परीक्षा, ती कोणतीही असो, प्रत्येक माणसाला त्याची भीती वाटत असते. कितीही तयारी केली तरी परीक्षेचा पेपर हाताखालून जाईपर्यंत परीक्षा संपेपर्यंत काही प्रमाणात भीती ही असतेच आणि ही भीती परीक्षेचा निकाल लागेपर्यंत थोड्याफार प्रमाणात राहातेच.

प्रत्येकाच्या आयुष्यात अशा काही गोष्टी असतात की त्यासाठी आपण कितीही तयारी केली तरी आयत्यावेळी थोडी धाकधुक वाटते. कितीही पट्टीचा बोलणारा वक्ता, रंगभूमीवर काम करणारा कलाकार ही भीती घालविण्यासाठी पडद्या आडून प्रेक्षागृहात बघत असतात. क्रिकेट खेळणारा उत्कृष्ठ फलंदाजही हवेत बॅट फिरवून आपली भीती घालविण्याचा प्रयत्न करतो. याप्रसंगी सुध्दा व्यक्तीला टेन्शन येत असेल ! तर परीक्षेला जाणाऱ्या विद्यार्थ्याला हा ताण जाणवला तर नवल नाही.

परीक्षेची भीती अनेक कारणांमुळे दिसून येते. पोटात दुखणे, नर्व्हस होणे, झोप येणे, काही न सुचणे, लक्षात राहील का नाही ? याबाबत संभ्रम निर्माण होणे, आयत्यावेळी न आठवणे, हातपाय गार पडणे अशा अनेक गोष्टी होण्याची शक्यता या काळात असते.

पेपर हातात आल्यावर घाबरून न जाता शांत चित्ताने प्रश्नाचे वाचन केल्यास आपल्याला आठवत असलेल्या प्रश्नांची उत्तरे लगेच लिहून टाकावित. एखाद्या प्रश्नामुळे जर काही आठवले नाही तर अन्य प्रश्नांची उत्तरेसुद्धा काही वेळात आठवेनाशी होतात. यासाठी शांत चित्ताने सोपे, साधे आठवणारे प्रश्न प्रथम सोडवावेत. बऱ्याच वेळा विचारलेल्या प्रश्नांमध्येच त्याचे उत्तर लपलेले असते. मात्र केवळ भीतीमुळे आपल्याला न उमजल्याने उत्तर सूचत नाही.

प्रश्नांची फोड करुन अर्थ लावून विचाराला थोडी चालना दिल्यास अडथळा दूर होतो व आपण आपोआप उत्तर लिहू लागतो. कुठलीही वस्तू हलविण्याआधी जोर द्यावा लागतो तशीच प्रक्रिया सूचण्याची व लिखाणाची आहे.

वस्तुनिष्ठ प्रश्नांना सामोरे जातेवेळी विचार करण्याची शक्ती उपयोगी पडते. अभ्यासाची उजळणी पूर्ण होणार का नाही याची भीती, परीक्षेची भीती प्रत्येकाला भेडसावत असते. अभ्यासाची भीती घालवण्यासाठी उजळणी करणे, आठवण्याचा प्रयत्न करणे यामुळे परीक्षेचे टेन्शन कमी होण्यास मदत होते. अभ्यासक्रमातील सर्वच भाग जड नसतो. काही भाग सोपा असतो. तो जरी लक्षात ठेवला तरी विषयानुरुप प्रश्नाचे उत्तर लिहिता येते.

परीक्षेला सामोरे जाताना विचारपूर्वक अभ्यासाचे तंत्र, सोप्यापद्धतीने नियोजन केल्यास भीती वाटणार नाही.

स्वामी विवेकानंद जयंती
१२ जानेवारी २०२०

महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे

कार्यवाह : प्रा. राजेंद्र सं. कांबळे
प्राचार्य : श्री. व्ही. पी. गावडे

संविधान दिन

मंगळवार दि. २६.११.२०१९ रोजी संविधान दिनाच्या निमित्ताने विद्यालय ते भरतनाट्य मंदिर, टिळकरोड मार्गे रॅली काढण्यात आली. रॅलीमध्ये विद्यार्थ्यांनी घोषणा दिल्या. रॅलीनंतर संविधान दिनाचा कार्यक्रम घेण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे आणि त्यांनी लिहिलेल्या संविधानाच्या प्रतिमा पूजन कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य व्ही. पी. गावडे आणि प्रमुख पाहुणे पोलीस विभागाचे अधिकारी श्री. राऊत यांच्या हस्ते करण्यात आले. संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन श्री. ज्ञानेश्वर दाते यांनी विद्यार्थ्यांकडून करवून घेतले. श्री. बी. पी. सावळे यांनी संविधानाबाबत माहिती विद्यार्थ्यांना दिली. प्राचार्य व्ही. पी. गावडे यांनीही भारतीय संविधानाचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशालेचे शिक्षक श्री. ज्ञानेश्वर दाते यांनी केले. आभार प्रदर्शन अध्यापक श्री. सवाईसर्जे विलास रामू यांनी केले. याप्रसंगी २६ - ११ च्या हल्ल्यातील हुताम्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

आरोग्य तपासणी

बुधवार दि. २७.११.२०१९ रोजी जिल्हा रुग्णालय, औंध पुणे यांच्यातर्फे डॉ. देवेंद्र खैरे, डॉ. वैभव पिसे यांनी विद्यालयातील ३३० विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणी केली. या कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य व्ही. पी. गावडे यांनी केले होते. या प्रसंगी सर्व शिक्षक - शिक्षकेतर सेवकांनी सहकार्य केले.

महात्मा फुले पुण्यतिथी

गुरुवार दि. २८.११.२०१९ रोजी महात्मा फुले पुण्यतिथी साजरी करण्यात आली. प्राचार्य व्ही. पी. गावडे यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. श्री. बी. पी. सावळे यांनी महात्मा फुले यांच्या कार्याविषयी विद्यार्थ्यांना सखोल माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन

शुक्रवार दि. ६.१२.२०१९ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य व्ही. पी. गावडे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या प्रसंगी कु. शंकर विक्रम गिलबिले, कु. सोमेश्वर बबनराव कदम, कु. आदित्य वसंत सोनोने इ. ८ वी अ या विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याविषयी व जीवनाविषयी आपले विचार व्यक्त केले. अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते, श्री. सवाईसर्जे, श्री. बी. पी. सावळे आणि प्राचार्य व्ही. पी. गावडे यांनीही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कर्तृत्व आणि योगदान या विषयी माहिती सांगितली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते यांनी केले. आभारप्रदर्शन अध्यापिका सौ. अरुणा सूर्यवंशी यांनी केले.

पालक - शिक्षक सभा

शनिवार दि. ७.१२.२०१९ रोजी पालक शिक्षक सभा दोन सत्रात घेण्यात आली. या सभेचे अध्यक्ष प्राचार्य व्ही. पी. गावडे हे होते. याप्रसंगी मागील सभेचा अहवाल, प्रथम सत्र परीक्षा निकाल, विद्यार्थी प्रगती अहवाल, शालेय शिस्त, स्वच्छता, गुणवत्ता, शालेय संगणक फी बाकी जमा करणे, शालेय सहली, इ. ९ वी व इ. १० वी बदललेली मूल्यमापन पद्धती, शाळेच्या शताब्दी वर्षात पालकांचा सहभाग, आयत्या वेळचे विषय व विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास अशा विविध विषयांवर इ. ५ वी ते १० वी पर्यंत प्रशालेतील सर्व वर्गशिक्षकांनी या सभेत चर्चा केली. सूत्रसंचालन श्री. ज्ञानेश्वर दाते यांनी केले. आभारप्रदर्शन अध्यापिका श्रीमती वैशाली मोघे यांनी केले.

टेक्निकल विभागाची पाहणी

दि. १० डिसेंबर २०१९ रोजी कनिष्ठ महाविद्यालयाच्या टेक्निकल विभागाची पाहणी करण्यात आली. पुणे शहर पथक क्र. ३ मधील श्री. धुमाळ

(डीव्हीओ सातारा), शिरुर आयटीआय चे प्राचार्य श्री. सूर्यवंशी आणि मुळशी आयटीआय चे प्राचार्य श्री. गोसावी यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पूर्ण व्यावसायिक, द्विलक्षी व उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाच्या सर्व लॅब आणि वर्कशॉपची पाहणी केली.

विद्यार्थ्यांचे जर्नल्स, जॉब प्रात्यक्षिके पाहून समाधान व्यक्त केले. विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकांसदर्भात प्रश्न विचारले. विद्यार्थ्यांकडून समाधानकारक उत्तरे मिळाल्याने त्यांनी सर्व शिक्षकांचे आणि विद्यार्थ्यांचे कौतुक आणि अभिनंदन केले आणि समाधान व्यक्त केले.

ऑलिंपियाड परीक्षा

महाविद्यालयामध्ये मागील १० वर्षांपासून सायन्स ऑलिंपियाड परीक्षा घेण्यात येतात. इ. ११ वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांचा उत्कृष्ट प्रतिसाद मिळत असून मोठ्या संख्येने विद्यार्थी परीक्षेस बसतात.

यावर्षी २१ नोव्हेंबर २०१९ रोजी ४६ विद्यार्थ्यांनी नॅशनल सायन्स ऑलिंपियाड परीक्षा दिली. त्याप्रमाणे ४८ विद्यार्थ्यांनी इंटरनॅशनल मॅथ्स् ऑलिंपियाड परीक्षा दिली. उपरोक्त परीक्षासांठी सौ. चौथाई, सौ. राठोड आणि श्री. चंदनशिवे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ✻✻

डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल,म्हसरूळ–नाशिक

उपकार्याध्यक्ष : श्री. संजय गुंजाळ
मुख्याध्यापिका : सौ. मनिषा साठे

प्राथमिक विभाग

दि. ११.११.२०१९ रोजी मौलाना आझाद यांची जयंती साजरी करण्यात आली. शिक्षक श्री. सचिन खांडवी यांनी मौलाना आझाद यांच्या कार्याविषयी माहिती सांगितली.

दि. १३.११.२०२९ रोजी कृतज्ञता दिवस साजरा करण्यात आला. दि. १४.११.२०१९ रोजी बालदिन साजरा करण्यात आला. पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. इ. १ली चे वर्ग सजविण्यात आले. इ. ४ थी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा घेण्यात आली.

दि. १८.११.२०१९ रोजी लाला लजपतराय यांची पुण्यतिथी प्रसंगी शिक्षिका सौ. पूजा परतणे यांनी विद्यार्थ्यांना लाला लजपतराय यांच्याबद्दल माहिती सांगितली.

दि. १९.११.२०१९ रोजी डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक परीक्षेमध्ये इ. ६ वी च्या १३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी कु. सोहम पवार - ६ वी अ, कु. स्वराज शंतनू गरगटे - ६ वी ब, कु. नकुल सतीश राहणे - ६ वी अ

दि. २२.११.२०१९ रोजी विद्यार्थ्यांचे लेखन कौशल्य वाढाविण्यासाठी इ. ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी निबंध लेखन स्पर्धा घेण्यात आली.

दि. २६.११.२०१९ रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला. शिक्षिका सौ. रत्ना गोसावी यांनी विद्यार्थ्यांना संविधान दिनाची माहिती दिली.

दि. २९.११.२०१९ रोजी इ. ५ वी ते ७ वी तील विद्यार्थ्यांसाठी मराठी निंबध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ✻✻✻

J. {X. 'mSJ i H$a ... dmL) '¶XeZ
(EH$ {M{H$ËgH$ Aä¶mg)
Sm. IrnmX Omer (E'.E.,~r.ES.,nrEM.Sr.)
J. {X. 'mSJ i H$a ¶mM dmL) '¶ (H${dVm, ZmQH$, H$Wm, H$mX~è¶m, b{bV, ~mbdmL) '¶) hm 'hmamï`mMm d 'amRrMm AZ'mb Rdm Amh. J.{X. 'mSJ i H$amÀ¶m ¶m dmL) '¶rZ H$VÊdmMm {dñVV AmTmdm d {M{H$ËgH$ Aä¶mg ¶m nñVH$mV H$bm Jbm Amh.
qH$'V ... én¶ 300/-

nU {dÚmWu Jh àH$meZ
1786, gXm{ed nR, nU 30

विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय,नेरूळ,नवी मुंबई शाखा

कोषाध्यक्ष : श्री. राजेंद्र बोऱ्हाडे
संचालक : श्री. दिनेश मिसाळ
संचालक : डॉ. शं. पां. किंजवडेकर

पूर्व-प्राथमिक मराठी विभाग

वेशभूषा स्पर्धा

विद्यार्थ्यांमध्ये सर्वांगीण विकास होण्यासाठी व वेगवेगळी कौशल्ये आत्मसात करण्यासाठी वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. दि. २९.११.२०१९ रोजी 'वेशभूषा स्पर्धा' चे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून सौ. प्रतिभा प्रविण कुमकर व सौ. फराना सिद्धीक चौगुले उपस्थित होत्या. परीक्षकांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व विजेत्या विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले.

माध्यमिक मराठी आणि कनिष्ठ महाविद्यालय मुख्याध्यापक श्री. शिवाजी माळी

बाल हक्क जागृती आठवडा अंतर्गत व्याख्यानाचे आयोजन

दि. १४ ते २० नोव्हेंबर २०१९ या कालावधीत **'बाल हक्क जागृती आठवडा'** साजरा केला जातो. त्यानिमित्ताने 'मुलांचे हक्क व सुरक्षा' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी प्रमुख वक्ते व मार्गदर्शक म्हणून नेरुळ पोलिस स्टेशनचे पोलिस निरिक्षक श्री. शिवाजी ढवळे हे उपस्थित होते. बालकांचे हक्क या विषयी बोलताना श्री. शिवाजी ढवळे यांनी बालविवाह, बालमजुरी, बाललैंगिक अत्याचार या विषयीच्या कायद्यांची तसेच मुलांनी घ्यावयाची काळजी याबाबत सखोल मार्गदर्शन केले. पोलिस निरिक्षक श्री. सुनिल गवळी यांनी सोशल मिडियाचा गैर वापर करुन होणाऱ्या फसवणुकीबाबत तसेच त्याबाबत घ्यावयाची सुरक्षा यासंबंधी मार्गदर्शन केले. प्रा. सुजय वाबळे यांनी सूत्रसंचालन केले. मुख्याध्यापक श्री. शिवाजी माळी यांनी आभार प्रदर्शन केले.

व्यक्तिमत्व विकासशिबिराचे आयोजन

दि. २९.११.२०१९ रोजी सकाळ माध्यम समुहामार्फत 'यिन संवाद' या कार्यक्रमांतर्गत **'व्यक्तिमत्व विकास'** या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री. संजीवन म्हात्रे तसेच सकाळ समूहाचे समन्वयक श्री. गणेश घोलप, ज्येष्ठ संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर उपस्थित होते. श्री. संजीवन म्हात्रे यांनी आपल्या विनोदी शैलीने तरुणांच्या मनातल्या नेमक्या गोष्टी हेरुन, शरीराची ठेवण, रंग, केसांची ठेवण, फॅशन अशा बाह्य व्यक्तिमत्वाबद्दलचे गैरसमज दूर केले तसेच आई-वडील व गुरुजनांच्या मार्गदर्शनानेच आपण आपले ध्येय गाठू शकतो त्यासाठी प्रयत्नांचे सातत्य ठेवावे असे सांगतांना संत ज्ञानेश्वर, सचिन तेंडुलकर, अमिताभ बच्चन व छत्रपती शिवाजी महाराज यांची उदाहरणे दिली. तुमचा एक्स फॅक्टर शोधा व आवडत्या विषयामध्ये करिअर करा असा मोलाचा सल्लाही त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. सुजय वाबळे यांनी केले. श्री. विठ्ठल मोरे यांनी आभार प्रदर्शन केले.

महाविद्यालयीन विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन

दि. २ डिसेंबर २०१९ रोजी 'विज्ञान प्रदर्शन' आयोजित करण्यात आले. ज्येष्ठ संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर यांनी प्रदर्शनाचे उद्घाटन केले. विज्ञान प्रदर्शनासाठी प्रदूषण समस्या व उपाय, संदेशवहन व दळणवळण, कृषी व औद्योगिक विकास, सौर ऊर्जा, कचरा व्यवस्थापन या विषयांवर ३० कृतीशील प्रकल्प सादर केले. विद्यार्थ्यांनी आपली कल्पकता व सर्जनशीलतेचा वापर करुन उत्कृष्ट प्रकल्प तयार केले होते. संचालक श्री. दिनेश मिसाळ व मुख्याध्यापक श्री. शिवाजी माळी, मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, सह. शिक्षिका श्रीमती राधिका लवटे, माध्यमिक विभाग शिक्षकांनी प्रदर्शनाला भेट देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले. विज्ञान विभाग प्रमुख श्री. विठ्ठल मोरे तसेच श्रीमती अश्विनी कोळी व इतर विज्ञान शिक्षकांनी प्रदर्शन यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले. तसेच तीन उत्कृष्ट प्रकल्पांची निवड करण्यात आली.

प्राथमिक इंग्रजी विभाग
मुख्याध्यापिका सौ. मनिषा मुळीक

बालदिन

दि. १३ नोव्हेंबर २०१९ रोजी स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांचा वाढदिवस 'बालदिन' म्हणून साजरा केला. बालदिनाचे औचित्य साधून बालमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी प्रमुख अतिथी डॉ. सुचेता किंजवडेकर (स्त्रीरोगतज्ञ), संचालक श्री. दिनेश मिसाळ, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. प्रमुख अतिथींनी आपल्या भाषणातून मुलांना मोबाईलचा वापर टाळावा. मुलांना मैदानावर खेळू द्यावे असे सांगितले. संचालक श्री. दिनेश मिसाळ यांनी विद्यार्थ्यांना बालदिनाच्या शुभेच्छा दिल्या व बालमेळाव्यानिमित्त आयोजित उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल पालकांचे अभिनंदन केले. बालमेळाव्यात पालकांनी विविध खाद्यपदार्थांची दुकाने सजवली होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. फरहाना चौगुले व आभारप्रदर्शन सौ. प्रिया तिय्यर यांनी केले.

२०१९ वार्षिक शैक्षणिक सहल

दि. २९ नोव्हेंबर २०१९ रोजी विद्याभवन प्राथमिक इंग्रजी विभागाची शैक्षणिक सहल टिकुजी नी वाडी, ठाणे येथे नेण्यात आली. या सहलीला ४ बसमध्ये एकूण १८७ विद्यार्थी, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी गेले होते. सकाळी ७.४५ वाजता सर्वांनी सहलीसाठी प्रस्थान केले. विद्यार्थ्यांनी सहलीमध्ये विविध प्रकारची झाडे, पक्षी, प्राण्यांचे पुतळे (प्रतिकृती), मत्स्यालय यांचे निरीक्षण केले. तसेच वॉटर पार्क आणि मनोरंजनात्मक राईडस् यांचाही आनंद लुटला

हाऊस अंतर्गत समूह नृत्य व समूह गायन स्पर्धा

दि. ७ डिसेंबर २०१९ रोजी जल, वायु, अग्नि व पृथ्वी हाऊसअंतर्गत समूहनृत्य व समूहगायन स्पर्धा घेण्यात आल्या. यावेळी परीक्षक श्रीमती प्रियदर्शनी रॉय व श्रीमती के. राजलक्ष्मी, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. विजेत्या हाऊसच्या विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक, परीक्षक व शिक्षकांनी अभिनंदन केले.

अभिनंदनीय वार्ता

दि. ८ डिसेंबर २०१९ रोजी चिन्मय मिशन मुंबई यांच्यातर्फे खारघर येथे आयोजित करण्यात आलेल्या गीतापठन स्पर्धेमध्ये प्राथमिक इंग्रजी विभागाच्या खालील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

विद्यार्थ्यांचे नाव	इयत्ता	गट/झोन	क्रमांक
कु. कृपा सु. शितकर	३ री	सी प्रेरणा	तृतीय
कु. आस्मी अ. कांबळे	२ री	बी प्रेरणा	तृतीय
कु. कार्तिक मो. लवटे	२ री	बी प्रेरणा	उत्तेजनार्थ
कु. ईशा सं. जावध	१ ली	बी प्रेरणा	तृतीय
कु. वर्निका मि. कदम	१ ली	बी प्रेरणा	तृतीय
कु. प्रगती प्र. भोरे	१ ली	बी प्रेरणा	उत्तेजनार्थ
कु. भूमी जयेश भोईर	१ ली	बी प्रेरणा	उत्तेजनार्थ

माध्यमिक इंग्रजी
मुख्याध्यापिका सौ. श्रीजा नायर

बालदिवस

दि. १४.११.२०१९ रोजी विद्याभवन शाळेच्या सभागृहामध्ये बालमेळावा आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमासाठी स्थानिक नगरसेवक मा. श्री. काशिनाथ पवार व त्यांच्या पत्नी सौ. आशाताई पवार, संचालक श्री. दिनेश मिसाळ उपस्थित होते. इयत्ता आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल्स लावले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते करण्यात आले. चाचा नेहरुविषयी माहिती विद्यार्थ्यांनी सांगितली. तसेच सहा. शिक्षिका श्रीमती पौर्णिमा कोकरे यांनी चाचाजी विषयी माहिती सांगितली. सहा. शिक्षिका श्रीमती अनुपमा कोटियन, यांनी नृत्य सादर केले. सर्व शिक्षक विविध राज्यांच्या पारंपारिक वेशभूषेत आले होते, त्यांनी कार्यक्रम सादर केला तसेच बालदिनाच्या शुभेच्छा दिल्या. प्रमुख अतिथी यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या, व चॉकलेटस् दिली. संचालक श्री. दिनेश मिसाळ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतेवेळी मोबाईचा वापर टाळा हा संदेश दिला. प्रमुख अतिथींच्या शुभहस्ते आनंद मेळ्याचे उद्घाटन करण्यात आले. त्यांनी सर्व स्टॉल्सना भेट दिली

व खेळाच्या स्टॉलवर त्यांनी खेळही खेळून आनंद लुटला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रीमती रत्ना सिंग यांनी केले.

महाराष्ट्र राज्यस्तरीय शालेय कुडो स्पर्धा

महाराष्ट्र राज्यस्तरीय शालेय कुडो स्पर्धा डी एस ओ आयोजित शेगाव, बुलढणा येथे दि. १६.११.२०१९ व १७.११.२०१९ रोजी आयोजित केली होती. त्यामध्ये खालील विद्यार्थ्यांनी सुयश संपादन केले. जिल्हास्तरासाठी त्यांची निवड करण्यात आली.

विद्यार्थ्यांचे नाव	इयत्ता	प्राप्त पदक
कु. आर्यन तळेकर	१०वी	सुवर्ण
कु. प्रांजल दाभेकर	८ वी	सुवर्ण
कु. निगारांजुल अब्दुल कलाम	१०वी	रौप्य
कु. रोहित दुधाडे	१०वी	कांस्य

शालेय बॉक्सिंग स्पर्धा

जिल्हास्तरीय शालेय स्पर्धा बॉक्सिंग क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे जिल्हा क्रीडा परिषद मुंबई व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय मुंबई आयोजित स्पर्धा दादोजी कोंडदेव स्टेडियम ठाणे येथे घेण्यात आली. **या स्पर्धेत कु. जुई जयवंत अंधेरे इ. ९वी हिने सुवर्ण पदक पटकावले.**

शालेय किक बॉक्सिंग स्पर्धा

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे जिल्हा क्रीडा परिषद ठाणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नवी मुंबई यांनी वारखरी भवन सी. बी. डी. बेलापूर येथे किक बॉक्सिंग स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांनी सुयश संपादन केले व मुंबई डिव्हिजन लेवल स्पर्धेसाठी त्यांची निवड झाली.

विद्यार्थ्यांचे नाव	इयत्ता	प्राप्त पदक
कु. जुई अंधेरे	९वी	सुवर्ण
कु. निगारांजुल अब्दुल कलाम	१०वी	रौप्य
कु. आर्यन तळेकर	१०वी	रौप्य
कु. आर्यन म्हात्रे	९वी	रौप्य
कु. सिद्धी कुंभार	१०वी	कांस्य
कु. रोहित दुधाडे	१०वी	कांस्य

शालेय कुस्ती स्पर्धा

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे जिल्हा क्रीडा परिषद ठाणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नवी मुंबई आयोजित शालेय कुस्ती स्पर्धा जय हनुमान कुस्ती आखाडा, सानपाडा येथे पार पडली. **या स्पर्धेत कु. जुई अंधारे इ. ९वी हिने सुवर्णपदक प्राप्त केले व तिची पुढील स्तरासाठी निवड झाली.**

मुंबई विभागीय शालेय कुस्ती स्पर्धा

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे जिल्हा क्रीडा परिषद रायगड व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय रायगड आयोजित मुंबई विभागीय शालेय कुस्ती स्पर्धा लायन्स क्लब हॉल, खोपोली येथे घेण्यात आली. या स्पर्धेत कु. जुई अंधारे, इ. ९ वी हिने रौप्य पदक पटकाविले.

शालेय कराटे स्पर्धा

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे जिल्हा क्रीडा परिषद ठाणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नवी मुंबई यांचेतर्फे कराटे स्पर्धा वारखरी भवन बेलापूर येथे आयोजित करण्यात आल्या. या स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांनी सुयश संपादन केले व त्यांची पुढील स्पर्धेसाठी निवड झाली.

विद्यार्थ्यांचे नाव	इयत्ता	प्राप्त पदक
कु. आर्यन तळेकर	१०वी	सुवर्ण
कु. सुजल कदम	१०वी	सुवर्ण
कु. जुई अंधारे	९वी	सुवर्ण
कु. प्रांजल दाभेकर	८वी	सुवर्ण
कु. आर्या बुधावले	६वी	सुवर्ण
कु. निगारअंजुम अब्दुल कलाम	१०वी	रौप्य
कु. सिद्धी कुंभार	१०वी	कांस्य
कु. क्षितीज देशमुख	१०वी	कांस्य
कु. पीयूष वाफारे	१०वी	कांस्य
कु. अनंतराज कोनार	१०वी	कांस्य

शालेय कुडो आणि मार्शल आर्ट स्पर्धा

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा परिषद ठाणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नवी मुंबई यांचेतर्फे कुडो आणि मार्शल आर्ट

स्पर्धा वारखरी भवन, सी. बी. डी. बेलापूर येथे दि. २४.१०.२०१९ रोजी आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांनी सुयश संपादन केले व त्यांची पुढील फेरीसाठी निवड करण्यात आली.

विद्यार्थ्यांचे नाव	इयत्ता	प्राप्त पदक
कु. आर्यन तळेकर	१०वी	सुवर्ण
कु. सुजल कदम	१०वी	सुवर्ण
कु. अनंतराज कोनार	१०वी	सुवर्ण
कु. रोहित दुधाडे	१०वी	सुवर्ण
कु. निगारअंजुम अब्दुल कलाम	१०वी	सुवर्ण
कु. प्रांजल दाभेकर	८वी	सुवर्ण
कु. ऋषिकेश तांबाडे	६वी	सुवर्ण

मुंबई विभागीय शालेय बॉक्सिंग स्पर्धा

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे जिल्हा क्रीडा परिषद मुंबई व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय मुंबई यांचेतर्फे सेंट्रल रेल्वे मॅकॅनिक इन्स्टिट्यूट, परेल येथे दि. २५.१०.२०१९ रोजी शालेय बॉक्सिंग स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत कु. जुई जयवंत अंधेरे हिने कांस्य पदक पटकावले.

मुंबई विभागीय शालेय कराटे स्पर्धा

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे जिल्हा क्रीडा परिषद मुंबई व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय मुंबई उपनगर जिल्हा क्रीडा संकूल, धारावी येथे दि. ८ व ९.११.२०१९ रोजी कराटे स्पर्धा आयोजित केली. या स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांनी सुयश संपादन केले व त्यांची पुढील फेरीसाठी निवड करण्यात आली.

विद्यार्थ्यांचे नाव	इयत्ता	प्राप्त
कु. आर्यन तळेकर	१०वी	रौप्य
कु. आर्या बुधावले	६वी	रौप्य
कु. सुजल कदम	१०वी	कांस्य

मुंबई विभागीय शालेय कुडो स्पर्धा

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे जिल्हा क्रीडा परिषद मुंबई उपनगर व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय मुंबई उपनगर आयोजित मुंबई विभागीय शालेय विभागीय कुडो स्पर्धा स्पोर्ट ऑथोरिटी ऑफ इंडिया कांदिवली येथे ११ नोव्हें २०१९ रोजी आयोजित केली. या स्पर्धेमध्ये खालील विद्यार्थ्यांनी सुयश संपादन केले.

विद्यार्थ्यांचे नाव	इयत्ता	प्राप्त
कु. आर्यन तळेकर	१०वी	सुवर्ण
कु. रोहित दुधाडे	१०वी	सुवर्ण
कु. निगार अंजुम	१०वी	सुवर्ण
कु. प्रांजल दाभेकर	८वी	सुवर्ण
कु. सुजल कदम	१०वी	रौप्य
कु. ऋषिकेश तांबडे	६वी	रौप्य

शालेय थ्रो बॉल स्पर्धा

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे जिल्हा क्रीडा परिषद ठाणे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नवी मुंबई आयोजित थ्रो बॉल स्पर्धेमध्ये विद्याभवन माध्यमिक इंग्रजी शाळेतील १४ वर्षाखालील मुले व मुली, १७ वर्षाखालील मुले व मुली असे एकूण ४ संघ सहभागी झाले होते. त्यामध्ये १७ वर्षाखालील मुलांच्या संघाने उपांत्य फेरीत प्रवेश केला व तृतीय क्रमांक मिळवला, तर तीन संघांनी उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

संविधान दिन

दि. २६ नोव्हें रोजी विद्याभवनाच्या सभागृहामध्ये संविधान दिन साजरा करण्यात आला. श्रीमती सायरा टोले व श्रीमती प्रिया थियार यांनी संविधान दिनानिमित्त विद्यार्थ्यांना माहिती दिली. तसेच विद्यार्थ्यांनी देखील माहिती सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रीमती अनुपमा कोटियन यांनी केले.

शैक्षणिक सहल

दि. ३ डिसें २०१९ रोजी विभागाची सहल टिकूजीनी वाडी, ठाणे येथे आयोजित केली होती. सहलीत ३४७ विद्यार्थी, सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी मत्स्यालय व डायनोसोर पार्क पाहिले तसेच विविध प्रकारच्या पाळण्यांमध्ये बसून सहलीचा मनमुरादपणे आनंद लुटला. शिक्षक व विद्यार्थी रेनडान्स व वॉटर पार्क यामध्ये खूप आनंदाने बागडत होते. अशाप्रकारे सकाळी ८ वाजता गेलेली सहल संध्याकाळी ७.३० वाजता परत आली.

अभिनंदन वार्ता

दि. ७ डिसें २०१९ रोजी रामकृष्ण मठ कोपरखैरणे आयोजित वक्तृत्व स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांनी सुयश संपादन केले. या स्पर्धेत नवी मुंबईतील ६ शाळा व ३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. ही स्पर्धा इंग्रजी मराठी व हिंदी या तिन्ही भाषांमधून घेण्यात आली.

विद्यार्थ्याचे नाव	इ/तु	भाषा	प्राप्त क्रमांक
कु. ओम सचिन गावडे	५वी/अ	मराठी	द्वितीय
कु. दिक्षा बापू अहेर	७ वी/अ	इंग्रजी	तृतीय
कु. भूमिका राजेश नवले	७ वी/ब	मराठी	प्रथम
कु. हर्षिता अनिल भोरी	७ वी/ब	हिंदी	द्वितीय

कु. भूमिका राजेश नवले हिची पुढील स्पर्धेसाठी निवड झाली.

अभिनंदन वार्ता

दि. ८ डिसेंबर २०१९ रोजी चिन्मय मिशन, खारघर आयोजित गीता पाठांतर स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत एकूण २ शाळा व १० विद्यार्थी यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांनी सुयश संपादन केले. सम्मान चिन्ह, प्रमाणपत्र व शैक्षणिक साहित्य मिळवून सुयश संपादन केले.

विद्यार्थ्याचे नाव	प्राप्त क्रमांक	इ/तु
कु. नीलम प्रसाद तरकसबंद	तृतीय	९ वी/अ
कु. गौरी रविंद्रनाथ प्रभू	तृतीय	९ वी/अ
कु. सिद्धी संजीव महाले	तृतीय	९ वी/ब
कु. ओम सचिन गावडे	उत्तेजनार्थ	५ वी/अ
कु. तुषार मोहन वाघ	द्वितीय	७ वी/ब
कु. दीक्षा बापू अहेर	उत्तेजनार्थ	७ वी/अ
कु. भूमिका राजेश नवले	उत्तेजनार्थ	७ वी/ब
कु. रिदा फिरोज पटवेगर	उत्तेजनार्थ	७ वी/अ

वरील सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेच्या व शाळेच्या वतीने हार्दिक अभिनंदन!

प्राथमिक मराठी मुख्याध्यापिका
सौ. सुवर्णा दिनेश मिसाळ

बाल आनंद मेळावा

दि. १४ नाव्हेंबर २०१९ रोजी विभागातर्फे बालदिनानिमित्त बालमेळाव्याचे आयोजन करण्यात आले. बालमेळाव्याच्या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून बालरोगतज्ञ डॉ. उपेंद्र किंजवडेकर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात ही पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या प्रतिमेचे पूजनाने झाली. विद्यार्थिनींनी ईशस्तवन व स्वागतगीत सादर केले. डॉ. उपेंद्र यांनी उपस्थित पालकांना आणि विद्यार्थ्यांना पौष्टीक आहाराचे महत्त्व सांगत आरोग्यदायी जीवनची त्रिसूत्री सांगितली. या बालमेळाव्यानिमित्त पालकांतर्फे विविध खाऊचे स्टॉल लावण्यात आले. प्रमुख अतिथी आणि सर्व बालगोपाळांनी खाण्याच्या विविध पदार्थांचा आनंद लुटला. बालमेळाव्यात इयत्ता सातवीतील विद्यार्थ्यांनी विविध खेळांचे स्टॉल लावले होते. प्रमुख अतिथी आणि विद्यार्थ्यांनी खेळाचा आनंद लुटला. या कार्यक्रमास ज्येष्ठ संचालक डॉ. शं. पां. किंजवडेकर आणि त्यांच्या सहचारिणी सौ. सुनिता किंजवडेकर आणि संचालक श्री. दिनेश मिसाळ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती नूतन गवांदे यांनी केले. आभार प्रदर्शन श्रीमती राधिका भोसले यांनी केले. ***

आपला पत्ता बदललेला आहे का?
समाचार संदर्भातील आपला बदललेला पत्ता
त्वरीत कळवावा ही विनंती.
पत्ता कळविताना जुना व नवा
दोन्ही पिन कोड कळवावा

संपादक

समाचार मासिक
पुणे विद्यार्थी गृह
१७८६, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.

मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ९

कार्यवाह : प्रा. राजेंद्र कांबळे
प्र. प्राचार्या : सौ. हेमांगिनी इनामदार
प्र. मुख्याध्यापिका : सौ. उत्कर्षा केणी

पूर्व-प्राथमिक विभाग

दि. २२.११.२०१९ रोजी सिनिअर के. जी. गटासाठी 'इंग्रजी कविता पाठांतर स्पर्धा' आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेला मुलांकडून मोठा प्रतिसाद मिळाला. परिक्षक म्हणून सौ. मनिषा नाईक व सौ. अर्चना सुदान यांनी काम पाहीले.

दि. २९.११.२०१९ रोजी सिनिअर के. जी. गटासाठी 'इंग्रजी हस्ताक्षर स्पर्धा' इंग्रजी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. ही स्पर्धा सर्व मुलांसाठी अनिवार्य होती. परिक्षक म्हणून सौ. शिल्पा पाटील व सौ. शारदा नागूल यांनी काम पाहिले.

दि. ३०.११.२०१९ रोजी सिनिअर के. जी. गटाने 'पालकाशाळा -३' चे आयोजन केले होते. दुपारी १ ते २ या वेळेत ही पालक शाळा आयोजिली होती.

सर्व शिक्षिकांनी डिसेंबर महिन्याचा अभ्यासक्रम तसेच स्नेहसंमेलनानिमित्त झालेला शाळेच्या वेळेतील बदल व्यवस्थित समजावून सांगितला. त्याच प्रमाणे स्नेहसंमेलनाच्या निगडीत सर्व सूचनाही दिल्या. शाळेच्या समुपदेशक सौ. मधुरा काळे यांनी मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी काही महत्त्वाच्या सूचना पालकांना दिल्या.

दि.२०.१२.२०१९ रोजी 'वार्षिक स्नेहसंमेलनाचा' कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाला पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. उत्कर्षा केणी प्रमुख अतिथी होत्या. तसेच कुलसचिव श्री. सुनिल रेडेकर, ज्येष्ठ संचालक प्राचार्य हणमंत भोसले, संचालक श्री. आनंद कुलकर्णी, श्री. कृष्णाजी कुलकर्णी व श्री. रमेश कुलकर्णी व इतर मान्यवर उपस्थिती होते.

या प्रसंगी शाळेचा वार्षिक आराखड्याचे वाचन शिक्षक प्रतिनिधी सौ. राजश्री कुलकर्णी यांनी केले. सौ. उत्कर्षा केणींच्या हस्ते मुलांना बक्षिसे देण्यात आली. **पूर्व - प्राथमिक विभागातील उत्कृष्ट शिक्षिका म्हणून सौ. जयश्री दायमा व सौ. प्रांजली कडुसकर यांना पुरस्कार देण्यात आला.** यानंतर छोट्या व मोठ्या गटातील मुलांचे विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम सादर करण्यात आले. या वार्षिक स्नेहसंमेलनासाठी पूर्व - प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका सौ. गीता उद्गीर व सौ. अनुपमा गुजराथी यांचे मर्गदर्शन लाभले.

प्राथमिक

दि. १९.११.२०१९ रोजी मुक्त व्यासपीठ अंतर्गत मीनी गॅदरींग आयोजित केले होते.

दि. ३०.११.२०१९ रोजी पालक शाळेचे आयोजन करण्यात आले होते.

दि. ११.१२.२०१९ रोजी २०१९-२० या शैक्षणिक वर्षाचे प्रदर्शन आयोजित केले होते.

दि. १६ डिसेंबर २०१९ रोजी क्रीडा दिन साजरा करण्यात आला.

दि. १८.१२.२०१९ रोजी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागातील मुलांसाठी अल्पोपहार आयोजित केला होता.

माध्यमिक विभाग

कु. ऋतुज चांदेकर (१० वी अ) या विद्यार्थ्याने दि. २३ नोव्हेंबर रोजी कलमाडी हायस्कूल, पुणे यांनी आयोजित केलेल्या शास्त्रीय गायनाच्या तसेच नाट्यसंगीत गायनाच्या स्पर्धेत **प्रथम क्रमांक** पटकावला.

दि. ३.१२.२०१९ रोजी शाळेत झालेल्या जर्मन वक्तृत्व स्पर्धेत कु. जान्हवी कलाल (इयत्ता १० वी क) हिने **प्रथम** तर श्रेया बुचडे (इयत्ता ८ वी क) हिने **द्वितीय** क्रमांक पटकावला.

दि. १३ व १४ डिसेंबर २०१९ रोजी वार्षिक प्रदर्शन आयोजित करण्यात आले. या प्रदर्शनाचा विषय 'Environmental problems created by man and their solutions' हा होता. प्रदर्शनाचे उद्घाटन महाराष्ट्रीय मंडळ कॉलेजच्या प्राचार्या सौ. संगीता भिडे

यांनी केले.

कु. वैष्णवी गिरमे (इयत्ता ९ वी अ) हिने दि. १४ ते २५ नोव्हेंबर २०१९ दरम्यान ग्वाल्हेर, मध्यप्रदेश येथे आयोजित झालेल्या 'National Rock Climbing Taining Camp' (२०१९-२०) ला तसेच उटी येथे झालेल्या 'National tracking' स्पर्धेत हजेरी लावली.

कु. पृथा आचरेकर (इयत्ता ८ वी ब) हिने नोव्हेंबर मध्ये झालेल्या 'ELPRO Sports Fest' मध्ये भाग घेतला. १४ वर्षाखालील वयोगटात तिने विजय मिळवला व तिला आंतरराष्ट्रीय ख्यातीचे क्रिकेटपटू श्री. कपिल देव यांच्या हस्ते ट्रॉफी मिळाली.

'चारित्र्य प्रतिष्ठान' पुणे यांच्यातर्फे दि. १ ते ३ नोव्हेंबर दरम्यान 'व्यक्तिमत्त्व विकास' कार्यशाळा घेण्यात आली. सदर कार्यशाळेत नैतिक मूल्यांवर भाषणे आयोजित करण्यात आली. सामजिक बांधिलकी, रक्तदान, राष्ट्रभक्ती, सामाजिक जाणीव, वाहतुकीचे नियमपालन, सुंदर हस्ताक्षर इत्यादी विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

या विविध कार्यक्रमात कु. अमेय कुलकर्णी (इ. ९ वी अ), कु. ऋतुपर्ण रानडे (इ. ८ वी ब), कु. दुर्वा पाटील (इ. ८ वी अ) यांनी भाग घेतला. कु. अमेय कुलकर्णी याने स्पर्धांत ३ रा क्रमांक पटकावला सदर कार्यशाळेत पुण्यातील विविध शाळांच्या १२० मुलांनी भाग घेतला.

कु. तनिष्का शितोळे (इ. १० वी क) हिने नीलांबरी नृत्य कला केंद्रातर्फे झालेल्या नृत्यपरीक्षेत उत्तम गुण मिळवून आरंगेत्रम् पूर्ण केले. तिला मानचिन्ह व प्रमाणपत्र मिळाले.

कु. शैली महाडिक (इ. ७ वी अ) हिने दि. २६ नोव्हेंबर २०१९ रोजी हुतात्मे झालेल्या पोलिसांच्या स्मृत्यर्थ्य झालेल्या जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धेत भाग घेतला. तिला तृतीय पारितोषिक, प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह मिळाले.

कु. श्रीहरी कुलकर्णी (इ. १० वी अ) व कु. रुद्र जोगळेकर (इ. १० वी अ) यांनी दि. १५ नोव्हेंबर रोजी ज्ञानप्रबोधिनी, पुणे येथे 'Department of Science and technology of India' तर्फे आयोजित झालेल्या २७ व्या 'National Children's Science Congress' मध्ये भाग घेतला व 'District level project presentation' मध्ये पदक व प्रमाणपत्र मिळवले. त्यांची 'State Screening level ' साठी निवड झाली आहे.

दि. २२ नोव्हेंबर रोजी शाळेत पथनाट्य स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत टिळक कुलाने प्रथम तर टागोर कुलाने द्वितीय क्रमांक पटकावला. पथनाट्य स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून दूरदर्शन कलाकार श्री. विजय पटवर्धन आणि श्री. रवींद्र बापट उपस्थित होते.

दि. २६ नोव्हेंबर २०१९ रोजी 'राज्यघटना दिन' साजरा करण्यात आला. सहशिक्षिका सौ. दीपाली केळकर यांनी राज्यघटना - निर्मिती व तिचे महत्त्व विशद केले. तर शालेय सेक्रेटरी कु. मल्हार रायरीकर (इयत्ता १० वी अ) याने ही राज्यघटनेविषयी विचार मांडले. प्रत्येक वर्गात शिक्षिकांनी नागरिकांची कर्तव्ये व हक्क सांगणाऱ्या राज्यघटनेविषयी विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले.

दरवर्षीप्रमाणे क्रीडादिन दि. १६.१२.२०१९ रोजी संपन्न झाला. **कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून शाळेच्या माजी विद्यार्थिनी असलेल्या छत्रपती पारितोषिक प्राप्त, आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या बॅडमिंटनपटू सौ संपदा सहस्त्रबुद्धे - केळकर उपस्थित होत्या.** तसेच कार्याध्यक्ष श्री. सुभाष जिर्गे, कुलसचिव श्री. सुनिल रेडेकर, संचालक श्री. राजेंद्र कडूसकर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन पर्यवेक्षिका सौ. सुप्रिया देशकुलकर्णी यांनी केले. उपस्थितांचे स्वागत प्राचार्या सौ. हेमांगिनी इनामदार यांनी केले. तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय पर्यवेक्षिका सौ. एब्रिल परेरा यांनी करून दिला.

शाळेतील चारही कुलांनी संचलन सादर केले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिके वितरीत करण्यात आली. स्पोर्टस् चॅम्पियनशिप चा पुरस्कार व मानचिन्ह प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बोस कुलाने स्वीकारला.

रोटरी क्लब, कात्रज पुणे व मुक्तांगण इंटरॅक्ट क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १० व ११ डिसेंबर २०१९ रोजी ई-वेस्ट व धान्याची देणगी जमा करण्यात आली. विद्यार्थी व शिक्षक यांनी यात हातभार लावला.

दि. २३ व २४ डिसेंबर २०१९ रोजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाचे स्नेहसंमेलन टिळक स्मारक नाट्यगृह येथे पार पडले.

दि. २३.१२. २०१९ रोजी प्राचार्या सौ. हेमांगिनी इनामदार यांच्या हस्ते विविध स्पर्धांत सुयश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके दिली गेली. दि. २४.१२.२०१९ रोजी समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून 'Synergy, Infrasys Management Pvt. Ltd.' चे चेअरमन डॉ. राजेंद्र हिरेमठ व त्यांच्या पत्नी सौ. लता हिरेमठ उपस्थित होत्या. तसेच कार्यवाह प्रा. राजेंद्र कांबळे उपस्थित होते. उपस्थितांचे स्वागत प्राचार्या सौ. हेमांगिनी इनामदार यांनी केले तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय पर्यवेक्षिका सायली धाक्रस यांनी करून दिला. शैक्षणिक सुयश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्या सौ. लता हिरेमठ यांच्या हस्ते पारितोषिके वितरीत करण्यात आली. तसेच सौ. लता हिरेमठ यांच्या हस्ते **'आदर्श शिक्षिका पुरस्कार' सौ. अपर्णा रणधीर आणि पर्यवेक्षिका सौ. सुप्रिया देशकुलकर्णी** यांना देण्यात आला. **आदर्श सेवक हा पुरस्कार श्री. मंगेश शुक्ला व श्री. गोविंद खर्डेकर यांना देण्यात आला.** प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणातून, सामाजिक भान जपण्याविषयी उपस्थितंचे प्रबोधन केले.

दि. २३ व २४ डिसेंबर २०१९ या दोन्ही दिवशी विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम सादर केले. स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमाची संकल्पना समन्वयक श्रीमती नूतन नेऊरगांवकर यांची होती.

उच्च माध्यमिक विभाग

अभिनंदनीय

दि. २७.११.२०१९ रोजी सकाळी मराठी व इंग्लिश या दोन्ही भाषेतून वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते. स्पर्धा इयत्ता ११ व १२ वी साठी आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेसाठी सौ. मुग्धा दातार परीक्षक म्हणून लाभल्या होत्या. या स्पर्धेत मराठी व इंग्लिश या दोन्ही भाषांमधून वक्तृत्व केले गेले. यासाठी कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रमुख सौ. मीना राणे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

निबंध स्पर्धा

दि. २०.११.१९ रोजी मराठी व इंग्रजी तसेच जर्मन भाषेत निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला होता.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन.

प्राथमिकविभाग

वार्षिक पारितोषिक वितरण व स्नेहसंमेलन

शनिवार दि. २१ डिसेंबर २०१९ रोजी प्राथमिक विभागाचे स्नेहसंमेलन साजरे झाले. **प्रमुख पाहुण्या म्हणून माजी विद्यार्थिनी कु. ऐश्वर्या काळे यांना आमंत्रित केले होते.** त्यांच्या हस्ते विविध स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना पुरस्कार देण्यात आले. **या वर्षी 'आदर्श शिक्षिका' म्हणून सौ. संगीता श्रीराम व सौ. क्षमा हर्डीकर यांना डॉ. शहाडे पुरस्कार, सौ. जोत्स्ना सुदुंबरेकर यांना सी. ए. गाडगीळ पुरस्कार तर सौ. स्वाती महाजन यांना श्री. प्रकाश केणी पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.**

प्रमुख पाहुण्या कु. ऐश्वर्या काळे यांनी त्यांच्या भाषणात त्यांच्या बालपणातील शाळेच्या आठवणींना उजाळा देत शाळेमुळे मी आज हे यशाचे शिखर गाठत आहे असे सांगितले.

सौ. स्नेहल गायकवाड, शिक्षिका प्रतिनिधी यांनी शैक्षणिक वर्षातील शाळेने घेतलेल्या विविध स्पर्धा, प्रकल्प यांचा अहवाल सादर केला. यावेळी कार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, कुलसचिव श्री. सुनील रेडेकर, संचालक श्री. रमेश कुलकर्णी उपस्थित होते.

***

विद्याप्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

तळेगाव अंजनेरी, ता. जि. नाशिक

संचालक : श्री. अमोल जोशी

मुख्याध्यापक : श्री. अशोक ना. ढिवरे

दि. ५.१२.२०१९ रोजी ऑस्ट्रेलियन पाहुणे 'टॉयलेट मॅन' म्हणून प्रसिद्ध असलेले श्री. मार्क बल्ला व त्यांच्या भगिनी श्रीमती ट्रेसी बल्ला यांनी विद्यालयास भेट दिली. याप्रसंगी संस्थेच्या नियामक मंडळ उपाध्यक्ष श्री. अ. पाटणकर, संचालक श्री. अमोल जोशी, रोटरी क्लब नाशिकचे श्री. फिरदोस कापडिया, श्री. ढुबे हे उपस्थित होते.

रोटरी क्लब ऑफ बॉक्स हिलसेंटर, मेलबर्न व रोटरी क्लब ऑफ नाशिक रोड यांच्यातर्फे मिळालेल्या देणगी टॉयलेट्सची पहाणी करण्यात आली. इ. ११ वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांशी टॉयलेट्स वापराबाबात संवाद साधण्यात आला. कु. ऋतुजा दाते, कु. अश्विनी कचरे, कु. दर्शना मोरे, कु. उषा खांडबहाले, कु. शितल पगार, कु. पूजा भस्मे, कु. हिरा पारधी, कु. सचिन गवळी या विद्यार्थ्यांनी पाहुण्यांशी इंग्रजी भाषेतून संवाद साधला. श्री. मार्क बल्ला यांच्या छायाचित्रावर त्यांची स्वाक्षरी घेतल्यामुळे ते अतिशय प्रभावित झाले.

श्रीमती ट्रेसी बल्ला यांनी संपूर्ण विद्यालयाची पाहणी केली. शालेय प्रार्थना, परिपाठ, विद्यार्थ्यांच्या समस्या, परिसर या बाबत उपशिक्षिका सौ. सुरेखा धामणे यांनी सविस्तर माहिती सांगितली. त्यांनी ग्रंथालयासही भेट दिली. मुख्याध्यापक श्री. अशोक ढिवरे यांचे चित्रकलेचे हस्तलिखित, महाकुंभमेळा हस्तलिखित बघितले. प्रयोग शाळेत विद्यार्थ्यांनी तयार केलेले प्रयोग - स्मार्ट सिटी, सोलर स्टडी लँप, वाहन अपघात टाळणे इ. प्रयोगांचीही पाहणी केली.

पाहुण्यांनी तळेगाव ग्राम पंचायतीस भेट दिली. यावेळी सरपंच श्रीमती मंगला निंबेकर, उपसरपंच श्री. त्र्यंबक पगार, सदस्य श्री. वामनराव दाते, सदस्य श्री. प्रवीण दाते, ग्रामसेवक श्री. अहिरे व ग्रामस्थ उपस्थित होते. ग्रामस्वच्छतेबाबत सर्वांबरोबर संवाद साधण्यात आला. प्राथमिक शाळेतील टॉयलेट्सची पाहणी करण्यात आली.

संस्थेस दिलेल्या टॉयलेट्सच्या देणगीबाबत व त्यांच्या चांगल्या देखभालीबाबत श्री. मार्कबल्ला व सर्व उपस्थितांनी समाधान व्यक्त केले. यापुढेही अपेक्षित असणारी शक्य तेवढी मदत करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. ***

डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल,म्हसरूळ–नाशिक

उपकार्याध्यक्ष : श्री. संजय गुंजाळ

मुख्याध्यापिका : श्रीमती भारती पाटील

माध्यमिक आणि उच्चमाध्यमिक विभाग

बालदिन उत्साहात साजरा

इ. ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांनी पंडित जवाहरलाल नेहरु यांचा जन्मदिन बालदिन म्हणून साजरा केला. वर्गप्रतिनिधीच्या हस्ते पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मुख्याध्यापिका सौ. भारती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी शाळेच्या पटांगणावर जाऊन खेळ, नाटिका, गाणे, समूहगीते, नृत्याभिनय असे विविध प्रकारचे उपक्रम सादर करुन बालदिन आनंदात साजरा केला.

इ. ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी पिपीटी प्रदर्शन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेसाठी संगणक शिक्षक श्री. सौरभ गायकवाड यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले.

साप्ताहिक क्रीडा महोत्सव उत्साहात साजरा

विद्यार्थ्यांसाठी साप्ताहिक क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये हाऊस प्रमाणे सामूहिक कब्बडी, क्रिकेट, धावणे, टग ऑफ वार व थ्रो बॉल सारखे खेळ व वैयक्तिक खेळही घेण्यात आले. या क्रीडा महोत्सवासाठी शिक्षक श्री. खान यांचे मार्गदर्शन लाभले.

वार्षिक पारितोषिक वितरण व स्नेहसंमेलन

दि. २३ डिसेंबर २०१९ रोजी विद्यालयाचे वार्षिक पारितोषिक वितरण व स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. 'नासा हनीवेल स्पेस जनरेशन एडन्डजरी कौन्सिल ऑस्टेलिया'च्या अपूर्वा जाखडी या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वतीपूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करुन दिला. कार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे यांच्या हस्ते पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यवाह प्रा. राजेंद्र कांबळे यांनी उपस्थितांना संस्थेविषयी माहिती सांगितली.

विद्यार्थ्यांनी चलचित्रांच्या सहाय्याने वार्षिक अहवाल सादर केला. मान्यवरांच्या हस्ते पारितोषक वितरण करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मनोगतामध्ये 'आशान्वित' या स्नेहसंमेलनाच्या विषयाची प्रशंसा केली. विद्यार्थ्यांनी विविध नृत्यप्रकारांच्या माध्यमातून सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. या प्रसंगी कोषाध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, कुलसचिव श्री. सुनिल रेडेकर, उपकार्याध्यक्ष श्री. संजय गुंजाळ, ज्येष्ठ संचालक प्राचार्य हणमंत भोसले, संचालक श्री. दिनेश मिसाळ, श्री. ए. एम. जोशी, देणगीदार श्रीमती गंगुताई धामणकर उपस्थित होत्या.

विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. आभार प्रदर्शन सौ. शर्मिला कुऱ्हे यांनी केले. ***

शिशुनिकेतन मराठी माध्यम पुणे

कार्यवाह : प्रा. राजेंद्र संपत कांबळे
प्र. मुख्याध्यापिका : सौ. अरुणा कांबळे

पारितोषिक वितरण व वार्षिक स्नेहसंमेलन

दि. १६.१२.२०१९ रोजी वार्षिक स्नेहसंमेलन टिळक स्मारक मंदिर, पुणे येथे उत्साहात पार पडले. प्रमुख पाहुणे ज्येष्ठ संचालक आणि महाराष्ट्र विद्यालयाचे माजी प्राचार्य हणमंत भोसले उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात अहवाल वाचनाने झाली. सौ. मोरे यांनी वर्षभर आयोजित केलेल्या कार्यक्रमाचा आढावा घेतला. सौ. ताम्हनकर यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करुन दिला. मुख्याध्यापिका सौ. अरुणा कांबळे यांनी प्रमुख पाहुण्यांचा सत्कार केला. प्राचार्य हणमंत भोसले यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. श्रीमती निलीमा बाड यांनी पारितोषिकांच्या यादीचे वाचन केले. या प्रसंगी संचालक वर्ग उपस्थित होता. मुख्याध्यापिका सौ. अरुणा कांबळे यांनी उपस्थितांचे आभार मानले. बालगट ते इ. ४ थी च्या विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम सादर केला. सौ. बापट यांच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली

***

अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, पुणे

संचालक : प्रा. राजेंद्र गो. कडुसकर
कुलसचिव : श्री. सुनिल रेडेकर
प्राचार्य : डॉ. योगेश नेरकर

राष्ट्रीय स्तरावरील 'स्टुडंट ऑफ द इयर' पुरस्कार कु. रुची अभंग या विद्यार्थिनीस जाहीर


कु. रुची अभंग

शैक्षणिक वर्ष २०१८ - १९ मध्ये मुद्रण अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या कु. रुची अभंग या विद्यार्थिनीने 'Tom Frescka National Level Competition' मध्ये सहभाग घेतला होता. विविध स्तरांवर चाचण्या घेतल्यानंतर तिला **'प्रिंटवीक स्टुडंट ऑफ द इयर'** हे पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. दि. ९ डिसेंबर २०१९ रोजी कुलसचिव श्री. सुनिल रेडेकर आणि संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर यांच्या हस्ते कु. रुची अभंग हिचा सत्कार करुन पुढील उज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या. ***

विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर, मुंबई शाखा

कोषाध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे
संचालक : श्री. दिनेश पि. मिसाळ

माध्यमिक मराठी
मुख्याध्यापिका सौ. योगिनी पोतदार

शिक्षण महर्षी समाजरत्न आबासाहेब दादासाहेब बंडगर सर स्मृती आंतरशालेय स्पर्धा

यामध्ये प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त केले.

चित्रकला स्पर्धा

विद्यार्थ्याचे नाव	इ/तु	गट	क्रमांक
कु. राजवाडकर उर्वा	७वी/अ	लहान	द्वितीय

वक्तृत्व स्पर्धा

कु. देसाई ईश्वरी	७वी/अ	लहान	उत्तेजनार्थ

निबंध स्पर्धा

कु. पवार सानिका	१०वी/ब	मोठा	द्वितीय

नंदकिशोर जयरामजी मेमोरियल आंतरशालेय टेबल टेनिस स्पर्धा

दि. २५ व २६ नोव्हेंबर २०१९ रोजी हिंदी हायस्कूल घाटकोपर येथे नंदकिशोर सिंग जयरामजी मेमोरियल आंतर शालेय टेबल टेनिस स्पर्धा घेण्यात आली. सदर स्पर्धेत सेमी इंग्रजी माध्यमातील विद्यार्थिनी कु. उर्वी कौस्तुभ राजवडकर, ७वी अ हिने मुलीच्या ज्यनिअर गटातून द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले.

संविधान दिवस

दि. २६ नोव्हेंबर रोजी प्रशालेत संविधान दिन साजरा करण्यात आला. सहा. शिक्षिका श्रीमती जोस्पीन डाबरे यांनी मुलांना संविधान दिनाची माहिती दिली तसेच इ. १०वी च्या वर्गांमधून संविधान उद्देशिकांचे वाचन करण्यात आले.

कबड्डी संघाचे यश

मुंबई उपनगर कबड्डी जिल्हा अजिंक्यपद निवडचाचणी स्पर्धेच्या किशोर गटात रेल्वे पोलिस बॉईजने आपल्या आक्रमक चढाईच्या बळावर स्वयंभू मंडळावर वर्चस्व संपादले. या संघात आपल्या प्रशालेतील इ. १०वी अ मधील सुयश मनोज खरात तसेच आर्यन विनय डोंगरे इ.८वी क या विद्यार्थ्यांनी उल्लेखनिय कामगिरी केली.

विज्ञान प्रदर्शन

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा, चिकित्सक वृत्ती वाढीस लागावी व सर्वांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण व्हावी यासाठी शालेय स्तरावर विज्ञान प्रदर्शन भरविण्यात आले होते. यात सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे मोठया संख्येने सहभाग घेतला व विविध प्रकल्पांचे सादरीकरण केले.

सदर प्रदर्शनामध्ये दि. १६.११.२०१९ रोजी माध्यमिक इंग्रजी विभागातील विद्यार्थ्यांनी प्रकल्प सादर केले. तर दि. २६.११.२०१९ रोजी माध्यमिक मराठी विभागातील विद्यार्थ्यांनी प्रकल्प सादर केले. यावेळी दोन्ही माध्यमातील विद्यार्थ्यांनी सुमारे १०० हून अधिक प्रकल्पांचे सादरीकरण केले.

या प्रदर्शनाचे उद्घाटन कोषाध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांच्या हस्ते झाले. यावेळी मुख्याध्यापक, समन्वयक आदि मान्यवरांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

मेंहदी

निसर्ग मंडळाने दि. २७.११.२०१९ रोजी इ. ५वी ते ९वी च्या विद्यार्थ्यांची मेहंदी स्पर्धा आयोजित केली होती. एकूण ९४ विद्यार्थ्यांनी यामध्ये भाग घेतला. परीक्षक म्हणून श्री. मस्के व श्री. तावडे यांनी काम पाहिले.

रांगोळी शिबीर

दि. २७.११.२०१९ रोजी अप्पासाहेब गरगटे सभागृहामध्ये विद्यार्थ्यासाठी रांगोळी शिबीर ठेवण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रता, स्थिरता व एकाच ठिकाणी जास्त वेळ बसण्याची सवय, अशा अनेक सवयींची वाढ व्हावी व त्याचा उपयोग शालेय अभ्यासक्रमासाठी व्हावा यासाठी निसर्गमंडळाने हा

उपक्रम राबवला होता. या शिबिरासाठी काही रांगोळी काढण्यामध्ये कुशल असलेल्या महिलांना मार्गदर्शनासाठी बोलावले होते. चहापानानंतर मार्गदर्शकांचे आभार श्रीमती रत्ना पाटील यांनी मानून कार्यक्रमाची सांगता केली.

एन वॉर्ड विज्ञान प्रदर्शन २०१९-२०

एन वॉर्ड विज्ञान प्रदर्शन दि. ३.१२.२०१९ ते ५.१२.२०१९ या कालावधीत डॉमनिक सॅव्हियो हायस्कूल, पंतनगर, घाटकोपर येथे आयोजित करण्यात आले. या निमित्ताने एस. टी. मेहता हायस्कूल, घाटकोपर पश्चिम येथे २५.११.२०१९ रोजी वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली होती. यामध्ये कु. स्नेहल अरुणकुमार माने ६वी/अ हिने आणि सहा. शिक्षक श्री. रूपेश नथुराम मांडवेकर यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला.

शालेय क्रीडा स्पर्धा

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी शालेय क्रीडा स्पर्धा दि. ६.१२.२०१९ ते १३.१२.२०१९ या कालावधीदरम्यान गट इ.५वी-६वी, गट ७वी- ८वी व गट ९वी- १०वी अशा तीन गटात घेण्यात आल्या. क्रीडा स्पर्धाचे उद्घाटन मुख्याध्यापिका श्रीमती पोतदार यांनी श्रीफळ वाढवून केले. यात ५० मी. धावणे, लंगडदौड, तोल सांभाळणे, लांब उडी, बॉल थ्रो, गोळा फेक, दोरी उडी या वैयक्तिक खेळांचा समावेश होता, तर सांघिक खेळात कबड्डी, लंगडी, खो-खो डॉजबॉल या खेळाचाही समावेश होता. यावर्षी स्पर्धा हाऊसप्रमाणे घेण्यात आल्या.

इ. १० वी उद्बोधन व्याख्यानांचे आयोजन

दि.११.१२.२०१९ बुधवार रोजी सेमीनार हॉलमध्ये पंत वालावलकर हायस्कूल, कुर्ला येथील श्रीमत रेखा मॅडम - बीजगणित, दि. १२.१२.२०१९ रोजी कनक प्रतिष्ठानचे श्री. प्रणय चव्हाण - विज्ञान, दि. १३.१२.२०१९ रोजी श्री. सुरेश जाधव - भूमिती दि.१४.१२.२०१९ रोजी डी. एस. हायस्कूल, सायन येथील डॉ. संजय मोहिते - विज्ञान २ या विषयांची गुणवत्तावाढीसाठी मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित करण्यात आली होती.

कै. श. गो. केतकर हस्ताक्षर शुध्द्लेखन स्पर्धा

दि. १२.१२.२०१९ रोजी कै. श. गो. केतकर हस्ताक्षर शुध्दलेखन स्पर्धा इ. ७वी व ८वी गटासाठी घेण्यात आली. या स्पर्धेत इ. ७वी व ८वीतील सर्व विद्यार्थी सहभागी झाले.

विद्याभवन नं. २
मुख्याध्यापक श्री. पांडुरंग बाबुराव मुळीक

संविधान दिन

दि. २८ नोव्हेंबर २०१९ रोजी अप्पासाहेब गरगटे सभागृहात संविधान दिन साजरा करण्यात आला. इ. १० वी अ च्या विद्यार्थ्यांनी संपूर्ण कार्यक्रमाची जबाबदारी पार पाडली. संविधान संगीतासोबत कार्यक्रमास आरंभ झाला. विद्यार्थ्यांनी पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, सरोजिनी नायडू इ. नेत्यांच्या वेशभूषा केल्या होत्या. दहशतवाद, शिक्षण, बालशोषण, हुंडापद्धती अशा अनेक विषयांवर विद्यार्थ्यांनी नाटके सादर केली. संविधान दिनाचे महत्त्व सांगितले.

स्पोर्टस् एरोबिक्स अँन्ड फिटनेस चॅम्पियनशिप स्पर्धा

१४ वी राष्ट्रस्तरीय स्पोर्टस् एरोबिक्स अँन्ड फिटनेस चॅम्पियनशिप २०१९ ही स्पर्धा दि. ३० नोव्हेंबर ते २ डिसेंबर या दरम्यान इंदिरा प्रियदर्शनी स्टेडिअम, नामपल्ली, हैद्राबाद, तेलंगणा येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत १६ राज्यातील ६०० हून अधिक खेळाडूंनी आपल्या उत्कृष्ट खेळांचे प्रदर्शन केले. या स्पर्धेत एकूण ५ विद्यार्थिनींनी सहभागी होऊन १२ सुवर्ण, ८ रजत व ४ कांस्य अशी एकूण २४ पदके पटकाविली. यशस्वी विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे

विद्यार्थिनीचे नाव	इ/तु	स्पर्धा	पदक
कु. चैताली नेवे	७वी/ब	TRIO	कांस्य
		PETITE	सुवर्ण
		FITNESS	सुवर्ण
		AERO	सुवर्ण
कु. मुग्धा जुवाटकर	७वी/क	INDIV	रजत
		TRIO	सुवर्ण
		PETITE	सुवर्ण
		FITNESS	सुवर्ण
		AERO	सुवर्ण
कु. निशा चाळके	८वी/ब	INDIV	सुवर्ण
		TRIO	सुवर्ण
		PETITE	रजत
		FITNESS	रजत
		AERO	सुवर्ण
कु. मौर्विका पालकर	९वी/अ	INDIV	कांस्य
		TRIO	रजत
		PETITE	रजत
		FITNESS	रजत
		AERO	सुवर्ण
कु. उर्वी पाताडे	९वी/अ	INDIV	कांस्य
		TRIO	रजत
		MIX PAIR	कांस्य
		FITNESS	रजत
		AERO	सुवर्ण

वार्षिक क्रीडा महोत्सव

माध्यमिक इंग्रजी विभागाचा वार्षिक क्रीडा महोत्सव दि. २०.११.२०१९ ते दि. २८.११.२०१९ या कालावधीत पार पडला. विद्यार्थ्यांनी खो-खो, कबड्डी, डॉजबॉल व लंगडी हे सांघिक खेळ आणि वैयक्तिक खेळात विद्यार्थ्यांनी बॉल थ्रो, धावणे, दोरी उड्या या स्पर्धांत सहभाग घेतला.

विज्ञानप्रदर्शन - एन वॉर्ड

दि. ३ डिसेंबर ते ५ डिसेंबर २०१९ या कालावधीत शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई उत्तर विभाग व विज्ञानप्रदर्शन आयोजन समिती एन विभागातर्फे विज्ञानप्रदर्शन भरविण्यात आले होते. या प्रदर्शनात लोकसंख्या शिक्षण या उपक्रमासाठी द्वितीय क्रमांक पटकाविला. विज्ञानमंडळाने तृतीय क्रमांक मिळविला. या प्रदर्शनामध्ये सहभागी असणारे विद्यार्थी पुढीलप्रमाणे

लोकसंख्या शिक्षण सहभागी विद्यार्थी -
१. कु. अंजली परमेश्वर कदम
२. कु. क्षितिजा मिलिंद सालेकर
मार्गदर्शक शिक्षक - श्रीमती जेनिफर फ्रान्सिस
विज्ञानमंडळ सहभागी विदयार्थी -
१. कु. भक्ती दिपक कुऱ्हाडे
२. कु. स्वयम् रविंद्र हांडे
मार्गदर्शक शिक्षक - सौ. तनुजा ह. पांडे, सौ. अनुराधा सं. वाघमारे

माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई विभाग आंतरशालेय टेबल टेनिस व बुध्दिबळ स्पर्धा कुलगुरू दादासाहेब केतकर टेबल टेनिस स्पर्धा

माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई विभाग आयोजित कुलगुरू दादासाहेब केतकर आंतरशालेय टेबल टेनिस स्पर्धा दि. २०.१२.२०१९ रोजी अप्पासाहेब गरगटे सभागृहात पार पडली. सदर स्पर्धेत ३२ शाळांमधील ८२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. प्रमुख पाहुणे श्री. श्याम देवाडीगा, टेबल टेनिस कोच यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. कोषाध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पर्यवेक्षक श्री. सुनील पाटील यांनी केले. सदर स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांनी बक्षिसे पटकाविली.

ज्युनियर गट मुली (इ. ५वी ते ७वी गट)

विद्यार्थिनीचे नाव	इयत्ता
कु. उर्वी कौस्तुभ राजवाडकर	७वी
कु. अन्वया महेंद्र परब	७वी

बुध्दिबळ स्पर्धा

